
11-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/10/2025 10:40 PM Page 1


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

बेतोडा शाळेच्या विद्यार्थ्यांना मैदानच नाही

पान ३ वर




व्हीएमसीएल ब्लास्टर्सची व्हीएमसीएल किंग्सवर मात

पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 218 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 11 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### गृह कर्ज स्वस्त होणार

नवी दिल्ली, दि. १० : रिझर्व्ह बँकेने रेपो दरात २५ बेसिक पॉइंट म्हणजे ०.२५ टक्के कपात केली असून यामुळे गृह कर्ज, वाहन कर्ज स्वस्त होण्याची शक्यता आहे. दरम्यान, जागतिक अर्थव्यवस्थेसाठी चालू आर्थिक वर्षे २०२५-२६ची सुरुवात चिंता वाढवणारी आहे. जागतिक समुदाय अस्वस्थ आहे, अशी कबुलीच गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली आहे. चालू आर्थिक वर्षातील २०२५-२६ची पहिली रिझर्व्ह बँकेची पतधोरण आढावा बैठक आज झाली. त्यात रेपो दरामध्ये ०.२५ टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला. यामुळे रेपो दर आता ६ टक्के झाला आहे. रिझर्व्ह बँकेने सलग दुसऱ्यांदा हे दर ०.२५ टक्क्यांनी कमी केले आहेत.

---

### मणिपूरमध्ये संचारबंदी लागू

इंफाळ, दि. १० : दोन जमातींमधील वादामुळे मणिपूरच्या चुराचांदपूर जिल्ह्यात बुधवारी १७ एप्रिलपर्यंत कर्फ्यू लागू करण्यात आला. मंगळवारी वादग्रस्त जागेवर आपापल्या समुदायाचे झेंडे फडकवण्यावरून झोमी आणि हमार जमातींमध्ये तणाव निर्माण झाला होता. वादग्रस्त जागा व्ही मुनहोइह आणि रेंगकाई गावांमध्ये आहे. व्ही मुनहोइह आणि रेंगकाई तसेच कांगवाई, सामुलामियान आणि सांगाइकोट येथे कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. तथापि, या भागात सकाळी ६ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कर्फ्यू शिथिल करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दोन्ही गावातील लोकांसोबत बैठक घेतली. यावेळी दोन्ही समुदायांनी सांगितले की हा वाद जातीचा नसून जमिनीचा आहे. बैठकीत लोकांना शांतता राखण्याचे आणि अफवा पसरवू नये असे आवाहन करण्यात आले.

---

### आयात शुल्कला तात्पुरती स्थगिती

वॉशिंग्टन, दि. १० : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ७५ हून अधिक देशांवरील परस्पर आयात शुल्क ९० दिवसांसाठी स्थगित केले. त्यांच्या निर्णयामुळे हे अंमलात आले आहे. तथापि, त्यांनी या सूटमध्ये चीनचा समावेश केलेला नाही, परंतु त्यावरील शुल्क १०४% वरून १२५% पर्यंत वाढवले आहे. चीनने प्रत्युत्तरादाखल ८४% शुल्क लादल्यानंतर ट्रम्प यांनी ही कारवाई केली. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर लिहिले की चीनने जागतिक बाजारपेठेचा आदर दाखवलेला नाही. म्हणूनच मी ते शुल्क १२५% पर्यंत वाढवत आहे. आशा आहे की चीन लवकरच समजेल की अमेरिका आणि इतर देशांना लुटण्याचे दिवस संपले आहेत. ट्रम्प म्हणाले की, ७५ हून अधिक देशांनी अमेरिकेच्या प्रतिनिधींना आमंत्रित केले आहे

---

### एटीएम ट्रान्झॅक्शनमध्ये १ मेपासून बदल

नवी दिल्ली, दि. १० : एसबीआयने एटीएमच्या ट्रान्झॅक्शनमध्ये १ मेपासून बदल करण्याची घोषणा केली आहे. एसबीआय ग्राहकांना आता दर महिन्याला ५ फ्री एटीएम ट्रान्झॅक्शन मिळणार आहेत. फ्री ट्रान्झॅक्शन संपल्यानंतर ग्राहकाला प्रत्येक ट्रान्झॅक्शनसाठी १५ रुपये प्लस जीएसटी द्यावा लागणार आहे. दुसऱ्या बँकेच्या एटीएमवर हे शुल्क २१ रुपये प्लस जीएसटी आहे. यातही बँक खात्यात जर २५ ते ५० हजार रुपये बॅलन्स असेल तर दुसऱ्या बँकेच्या एटीएमवर ५ फ्री ट्रान्झॅक्शन मिळतील. तर खात्यात एक लाखांपेक्षा जास्त रक्कम असेल तर सर्व बँकेच्या एटीएमवर फ्री ट्रान्झॅक्शन मिळतील.

### हवामान

कमाल : ३२ किमान : २५
आर्द्रता : ७१

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९३,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७७,३६५ .७७↑ (२३१.१६ )
निफ्टी : २२,२३५.९० ↑ (८३.९५)

# वीज विभागाच्या नोटिसांविरोधात दूरसंचार कंपन्या उच्च न्यायालयात

टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १० : वीज विभागाचे कार्यकारी अभियंता काशिनाथ शेट्ये यांना ऑप्टिक फायबर केबल्स कापण्याचा आणि त्यांच्या पायाभूत सुविधा वापरल्याबद्दल ३ कोटी रुपयांची भरपाई मागण्याचा अधिकार नाही, असा आरोप करत दोन दूरसंचार कंपन्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात धाव घेतली आहे.**

१७ फेब्रुवारी २०२५ रोजी, वीज विभागाने मेसर्स एजकॉम टेलिकम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि आणखी एका कंपनीला नोटिसा बजावत, गेल्या पाच वर्षांपासून विभागाच्या पायाभूत सुविधांचा उपयोग केल्याबद्दल ३ कोटी रुपये (१८ टक्के जीएसटीसह) भरण्याचे निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे, विभागाने खांबांवर टाकलेल्या हवाई केबल्सच्या बदल्यात ८० लाख रुपये दंड भरण्याचे आदेश दिले होते. हा शुल्क दर प्रति खांब ३०० रुपये इतका ठरवण्यात आला होता.

या आदेशाविरोधात, दोन्ही दूरसंचार कंपन्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करत वीज विभागाने बजावलेली नोटीस रद्द करण्याची मागणी केली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने वरिष्ठ वकील ॲड. सुबोध कंटक आणि ॲड. अभिजित गोसावी यांनी युक्तिवाद करताना न्यायालयाला सांगितले की, कार्यकारी अभियंता शेट्ये यांना अशा नोटिसा जारी करण्याचा अधिकार नाही. तसेच, हा आदेश नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे आणि दूरसंचार कायदा, २०२३ च्या तरतुदींचे उल्लंघन करत जारी करण्यात आला आहे, असे त्यांनी निदर्शनास आणले.

ॲड. कंटक यांनी स्पष्ट केले की, कार्यकारी अभियंता शेट्ये यांची नियुक्ती केवळ भूसंपादन आणि मालमत्ता व्यवस्थापनासाठी नोडल अधिकारी म्हणून झाली होती. त्यामुळे, त्यांना अशा प्रकारच्या नोटिसा बजावण्याचा अधिकार नसून, हा आदेश अधिकारक्षेत्राबाहेरचा आहे. त्याचप्रमाणे, द इंडियन टेलिग्राफ राईट ऑफ वे नियम, २०१६ नुसार, दूरसंचार मंत्रालयाने भूमिगत तसेच हवाई पायाभूत सुविधांच्या नियमनासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे वीज विभागाच्या नोटिसा बेकायदेशीर असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने या प्रकरणात वीज विभागाचे मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता , मुख्य सचिव, गोवा सरकारमधील माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि दळणवळण विभाग तसेच भारत सरकारच्या दळणवळण मंत्रालयाला नोटीस बजावली आहे. सर्व प्रतिवादींना तीन आठवड्यांच्या आत उत्तर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ मे २०२५ रोजी होणार आहे. यंदाच्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात वीज विभागाने मोठ्या प्रमाणावर केबल कट मोहीम राबवल्याने राज्यभर इंटरनेट सेवा खंडित झाल्याच्या घटना घडल्या होत्या. या प्रकरणाला त्या घटनांशी संबंधित म्हणून पाहिले जात आहे.

# नारळ टंचाई जाहीर करण्याची मागणी

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १० : गोव्यात वाढत्या नारळ टंचाईची गांभीर्याने दखल घेत, स्थानिक शेतकरी आणि आदर्श कृषी सहकारी खरेदी विक्री प्रक्रिया संस्था मर्यादित, बाळ्ळी यांनी सरकारकडे अधिकृतरित्या नारळ तुटवडा जाहीर करण्याची आणि उत्पादकांना आवश्यक पाठबळ देण्यासाठी ठोस धोरण आखण्याची मागणी केली आहे.

संस्थेचे अध्यक्ष प्रकाश वेळीप यांनी हेराल्ड मीडियाशी बोलताना नारळाच्या उपलब्धतेतील घट आणि त्याच्या परिणामांबाबत चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की , सरकारने या टंचाईच्या मूळ कारणांचा शोध घेत तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज आहे. आम्ही पूर्वी प्रति युनिट ८० रुपयांना विकत घेतलेला कोपरा आता १६० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. हे टंचाईचे स्पष्ट लक्षण आहे. याशिवाय, साध्या नारळाच्या किमतीही ४० रुपयांच्या घरात पोहोचल्या आहेत.

वेळीप यांनी नारळाच्या तुटवड्याची काही संभाव्य कारणे नमूद केली. यात नारळाच्या रोपांची मोठ्या प्रमाणात विक्री, झाडांना होणारे आजार, माकडांमुळे होणारे नुकसान तसेच वाढत्या उत्पादन खर्चाचा समावेश आहे. शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळावी यासाठी कृषी आणि वैज्ञानिक संसाधने सरकारने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी त्यांनी केली.

आमच्या संस्थेशी संलग्न सुमारे ३,००० पुरवठादारांचे नेटवर्क आहे. जर सरकारने वेळीच हस्तक्षेप केला नाही, तर आगामी काळात परिस्थिती अधिकच बिकट होईल आणि ग्राहकांना वाढत्या किमतींचा मोठा फटका बसेल, असा इशारा त्यांनी दिला. वेळीप यांनी सरकारला बाजारव्यवस्था स्थिर करण्यासाठी आणि शेतकरी तसेच ग्राहक दोघांचेही संरक्षण करण्यासाठी थेट आधार यंत्रणा लागू करण्याची मागणी केली. ते म्हणाले, नारळ खरेदी आणि वितरणासाठी कोणतेही नियमन किंवा समर्थन व्यवस्था सध्या अस्तित्वात नाही. हे चित्र बदलले पाहिजे

नारळ टंचाईच्या पार्श्वभूमीवर, वेळीप यांनी काजू उत्पादनाच्या बाबतीत सकारात्मक माहिती दिली. ते म्हणाले, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा काजू उत्पादनात वाढ झाली

पान २ ▶

# खा. विरियातोंचे हाउजीला समर्थन

## कॅसिनोवर बंदीची मागणी

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १० : दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी हाउजी या लोकप्रिय पारंपरिक खेळावर घातलेल्या बंदीच्या निर्णयावर दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी गुरुवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. हाउजी हा खेळ सामाजिक दुष्कृत्य समजला जात असेल, तर कॅसिनोंना चालू ठेवण्यास परवानगी का दिली जात आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

खासदार फर्नांडिस यांनी प्रशासनाच्या या निर्णयामागील कारणे आणि त्यामध्ये कोणते प्रभावशाली घटक कार्यरत आहेत, याची चौकशी होण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. तसेच, हायकोर्टाच्या आदेशानंतर होऊ घातलेल्या अनधिकृत घरांच्या नियमितीकरणाच्या निर्णयावरही त्यांनी सवाल उपस्थित केला. सरकारचा हा निर्णय शतकभरापासून तेथे राहणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या हितासाठी आहे की फक्त आमदारांच्या हितसंबंधांना जपण्यासाठी, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

हाउजी हा खेळ गावातील उत्सव, चर्च, चॅपल तसेच स्थानिक क्रीडा स्पर्धांमध्ये मोठ्या प्रमाणावर आयोजित केला जातो. ही एक पारंपरिक प्रथा असून, कुटुंबे आणि ज्येष्ठ नागरिक यांना एकत्र आणण्याचे माध्यम आहे. त्यामुळे, या बंदीमुळे स्थानिक संस्कृती आणि सामाजिक एकजूट धोक्यात येईल, असा इशाराही फर्नांडिस यांनी दिला.

खासदारांनी असेही नमूद केले की, या खेळामुळे कोणत्याही व्यक्ती,

पान २ ▶

# दोन नाईकांची तासभर खलबते

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १० : गोव्यातील राजकीय वर्तुळात भाजपचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक आणि राज्याचे कृषिमंत्री रवी नाईक यांच्या फोंडा येथील तासभर चाललेल्या चर्चेची सध्या मोठी चर्चा रंगली आहे. भाजपपासून भंडारी समाज दुरावत आहे, अशी पार्श्वभूमी असताना ही भेट झाल्याचे समजते. विशेष म्हणजे, दोघेही भंडारी समाजातील प्रभावशाली नेते असून त्यांच्या या संवादाला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

गेल्या काही काळात भाजपने वेगवेगळ्या समाजघटकांमध्ये आपली पकड मजबूत केली असली, तरी भंडारी समाजामध्ये असंतोष वाढल्याचे संकेत मिळत आहेत. स्थानिक स्तरावरील काही निर्णय, उमेदवारी वाटप, तसेच समाजाच्या मागण्यांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे ही नाराजी निर्माण झाली असल्याचे बोलले जाते. त्यामुळेच भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी स्वतः पुढाकार घेत कृषिमंत्री रवी नाईक यांच्याशी चर्चा केली, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

भंडारी समाजात मोठा प्रभाव असलेल्या रवी नाईक यांच्यासोबत भाजपने संवाद वाढवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या समाजाचा विश्वास परत मिळवण्यासाठी भाजपला ठोस पावले उचलावी लागणार आहेत. अन्यथा पक्षाला राजकीय फटका बसू शकतो, याची जाणीव पक्ष नेतृत्वाला झाल्यानेच ही बैठक आयोजित केल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, अलीकडे भंडारी समाजाच्या नेत्यांनी जातनिहाय जनगणनेसाठी विरोधी पक्षांना निवेदने देण्यास सुरुवात केली आहे. भाजपचे माजी मंत्री दयानंद मांद्रेकर आणि माजी आमदार किरण कांदोळकर यांनी गोवा फॉरवर्डचे अध्यक्ष विजय सरदेसाई आणि मगोपचे अध्यक्ष दीपक ढवळीकर यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. भंडारी समाजाने विधानसभेत ५० टक्के म्हणजेच २० जागा राखीव ठेवण्याची मागणी केली होती. काही महिन्यांपूर्वी रवी नाईक यांची भेट घेऊन त्यांना या मागणीचा पाठपुरावा करण्यास सांगण्यात आले होते.

फोंडा तालुक्यातील चार मतदारसंघांमध्ये भाजपच्या स्थितीचा आढावा घेतला गेला. विशेषतः प्रियोळ मतदारसंघ भाजप लढवणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी काही दिवसांपूर्वी कार्यकर्ता मेळाव्यात ही घोषणा केली होती. तसेच, मगोपला हा निर्णय मान्य नसेल, तर त्यांनी चालते व्हावे असा थेट इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी फोंडा तालुक्यातील स्थितीचा आढावा कृषिमंत्री रवी नाईक यांच्यासोबत घेतला, अशी माहिती समोर आली आहे.

# २६/११ च्या हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण

## भारतात पोहोचताच एनआयएने जारी केले छायाचित्र

**नवी दिल्ली, दि. १०** : राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) २६/११ मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर राणा भारतात आल्यानंतर त्याचा पहिला फोटो प्रसिद्ध केला आहे. एनआयएने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील एका पोस्टमध्ये माहिती दिली की तहव्वुर राणा आयजीआय, नवी दिल्ली येथे पोहोचताच त्याला औपचारिकपणे अटक करण्यात आली आहे.२६/११ च्या मुंबई हल्ल्यातील आरोपी तहव्वुर राणा याचे गुरुवारी प्रत्यार्पण करण्यात आले.




पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक राणा अमेरिकेच्या तुरुंगात होता. अमेरिकेत, तहव्वुर राणाला २०१३ मध्ये त्याचा मित्र डेव्हिड कोलमन हेडलीसह मुंबईवरील हल्ला घडवून आणल्याबद्दल आणि डेन्मार्कमध्ये हल्ल्याची योजना आखल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले. राणाच्या प्रत्यार्पणाची मागणी बऱ्याच काळापासून होती. मे २०२३ मध्ये तहव्वूर हुसैन राणा याच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेतील कोर्टाने मंजुरी दिली होती. मात्र, या निर्णयाला त्याने अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टात याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले होते. मात्र, ही याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली होती. यानंतर तहव्वूर हुसैन राणा याला भारतात आणले जाईल, याबाबतचे कयास मांडले जात होते.

तहव्वूर राणाचा जन्म पाकिस्तानात झाला. पण तो कॅनडाचा नागरिक आहे. तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणासाठी भारत सरकारने अमेरिकेला विनंती केली होती. तहव्वूर राणा हा त्याचा मित्र डेव्हिड हेडली याच्यासह डेन्मार्कमध्ये मुंबईवर हल्ला घडवून आणण्याच्या आणि हल्ल्याची योजना आखल्याच्या आरोपाखाली २०१३ मध्ये दोषी आढळला होता. अमेरिकन कोर्टाने त्याला १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती.

२६ नोव्हेंबर २००८ च्या रात्री १० दहशतवाद्यांनी मुंबईतील अनेक इमारतींवर एकाच वेळी हल्ला केला होता. या हल्ल्यात १६४ जणांचा मृत्यू झाला होता. या कारवाईत ९ दहशतवादीही ठार झाले. हे दहशतवादी पाकिस्तानच्या भूमीवर कार्यरत असलेल्या लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचा भारताचा आरोप आहे. या हल्ल्यातील अजमल कसाब या दहशतवाद्याला जिवंत पकडले गेले, त्याला नोव्हेंबर २०१२ मध्ये फाशी देण्यात आली.

दुसरीकडे, पाकिस्तानी-अमेरिकन नागरिक असलेल्या डेव्हिड हेडलीविरोधात भारतीय यंत्रणांकडून सुरू असलेल्या तपासात एक नाव वारंवार समोर येत होते ते तहव्वूर हुसैन राणाचे. शिकागो येथे कडेकोट बंदोबस्तात चार आठवडे चाललेल्या खटल्यादरम्यान राणाबाबतचे अनेक तपशील समोर आले. यादरम्यान त्याच्या बालपणीचा जवळचा मित्र हेडलीची पार्श्वभूमीही समोर आली. पण या प्रकरणात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हेडली तहव्वूर राणाविरुद्ध सरकारी साक्षीदार झाला. हेडलीने मुंबई हल्ल्याच्या नियोजनाबाबत तपशीलवार साक्ष दिली. तसेच, त्याची आणि राणाचा सहभाग नेमका किती होता, हेही स्पष्ट केले.

राणा आणि हेडली बालपणापासूनचे मित्र होते. दोघेही एकाच शाळेत पाच वर्षे शिकले. शाळा सोडल्यानंतर २००६ मध्ये शिकागोमध्ये दोघे पहिल्यांदा भेटले होते. शिकागो येथील खटल्यात हेडली राणापेक्षा लष्कर-ए-

पान २ ▶


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

Bharose ka Bank Bhavishya ka Bank

## पाया विश्वासाचा, जोड तंत्रज्ञानाची

### लेखापरीक्षित निकाल

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | ३१-०३-२०२५ | ३१-०३-२०२४ |
|---|---|---|
| एकूण उलाढाल | २३,१०५ | २२,४६३ |
| ठेवी | १४,८४९ | १४,५८८ |
| कर्जे | ८,२५६ | ७,८७५ |
| ढोबळ नफा | २५२ | २८० |
| निव्वळ नफा | १८५ | २१६ |
| स्वनिधी | १,६३९ | १,७१९ |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ३.५९% | ३.६६% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | ०.००% | ०.००% |
| पुंजी पर्याप्तता | १७.४८% | १७.५७% |

(दिनांक १० एप्रिल २०२५)

www tjsbbank co.in | Toll Free 1800 266 3466 | 1800 103 466